CMYK

सुविचार

प्रश्न विचारणे ही ज्ञानाच्या शोधाची पहिली पायरी आहे.

# दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com



लग्नासाठी नवरी मिळेना'वर'पित्याला लाखो रुपयांचा चुना

पेज ४

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 130 ■ गुरूवार दि.19 जून 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

# इच्छुकांना दिलासा: जिल्हा परिषद निवडणुकीची गट रचना व आरक्षण पुन्हा निघणार

## २०२२ च्या सोडतीत अनेक दिग्गजांचे गट झाले होते राखीव

सुभाष कुलकर्णी | आरंभ मराठी

तेर –लवकरच होऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकीच्या गट व गणाचे पुनर्रचनेसह आरक्षण नव्याने काढण्यात येणार आहे. २०२२ मध्ये झालेल्या आरक्षण सोडतीमध्ये अनेक दिग्गजांचे गट राखीव झाले होते. आता नव्याने गट व गणाची पुनर्रचना व आरक्षण निघणार असल्याने इच्छुकांना दिलासा मिळाला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांच्या आत घेण्यासाठी वेगाने घडामोडी घडत आहेत. प्रशासकराज येऊन तीन वर्षे होऊन गेली.

तब्बल आठ वर्षांनी इच्छुक पुन्हा कामाला लागले आहेत.२८ जुलै २०२२ ला काढण्यात आलेल्या आरक्षण सोडतीमध्ये धाराशिव तालुक्यातील जिल्हा परिषद गटाची संख्या १२ वरून १४ वर गेली होती. आळणी व कारी हे २ गट निर्माण झाले होते. परंतु कारी हे परत सोलापूर जिल्ह्यात समाविष्ट झाले आहे. १४ गटापैकी कोंड, तेर, सारोळा (बु) बेंबळी, केशेगाव, करजखेडा हे गट आरक्षीत झाले होते. त्यामुळे २०१७ च्या निवडणुकीत जिल्हा परिषद सदस्य बनलेल्या दिग्गजांना नवीन गट शोधावा लागणार होता. परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आता नव्याने २०१७ चा आधार घेऊन गटाची पुनर्रचना व आरक्षण निघणार असल्याने अनेक इच्छुक मंडळींना दिलासा मिळणार आहे. धाराशिव तालुक्यात पुर्वीचेच १२ जिल्हा परिषद गट राहणार आहेत. गटाची रचना करताना गावे इकडची तिकडे होऊ शकतात. २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीतील प्रभाग रचना गृहीत धरून ही आरक्षण सोडत निघणार आहे. धाराशिव जिल्ह्याचा विचार करता गटाची संख्या ही ५५ एवढीच राहणार आहे. २०२२ च्या सोडतीत ही संख्या ६१ वर गेली होती. ती आता २०१७ च्या निवडणुकी प्रमाणे ५५ गट अशीच असून गणांची संख्या ही ११० असणार आहे. गेल्या तीन वर्षांहून अधिक काळ प्रशासक राजवटीत गेला. आता सुप्रीम कोर्टाने ओ.बी.सी.आरक्षणाचा प्रश्न निकाली काढल्याने आता येत्या काही महिन्यातच निवडणुकाचा बिगुल वाजणार असून, त्यासाठी कालबद्ध कार्यक्रम निवडणूक आयोगाने निश्चित केल्याने लवकरच जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकीने वातावरण ढवळून निघणार आहे.




### जिल्ह्यातील तालुकानिहाय जिल्हा परिषद गट संख्या

| | गट | गण |
|---|---|---|
| धाराशिव. | १२ | २४ |
| तुळजापूर. | ९ | १८ |
| उमरगा. | ९ | १८ |
| कळंब | ८ | १६ |
| परंडा. | ५ | १० |
| भूम. | ५ | १० |
| लोहारा | ४ | ८ |
| वाशी | ३ | ६ |

# कत्तलीसाठी जाणारी ४६ गोवंशीय जनावरे पकडली

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव शहर पोलिसांच्या पथकाने बुधवारी मध्यरात्री गोवंशीय जनावरांची अवैध वाहतूक करणाऱ्या दोन टॅम्पोना शिताफीने पकडून मोठी कारवाई केली. यावेळी तब्बल ४६ जनावरांची पोलिसांनी सुटका केली. तसेच जवळपास २७ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, दिनांक १८ जून रोजी मध्यरात्री साडेबारा वाजता गोपनीय माहिती आधारे पोलीस ठाणे धाराशिव शहर व स्थानिक गुन्हे शाखा, धाराशिव येथील कार्यरत पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी धाराशिव शहरातील इंडीया विटभट्टी जवळ वैराग रोड येथे सापळा लावला असता, वैरागकडून एक इटकरी रंगांचा आयशर टेम्पो (क्रमांक एम एच ४५ ०९२७) आला होता. पोलीस पथकाने टेम्पोच्या पाठीमागील बाजूची पाहणी केली असता, त्यामध्ये १४ जर्शी गायी मिळून आल्या. टेम्पो चालकास नाव इरशाद कमाल नदाफ (वय ३१ वर्षे, रा. जुना बाजार तळ, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर) असे सांगितले. त्या टेंम्पो च्या पाठीमागून आणखी एक निळया रंगाचा आयशर टेम्पो (क्रमांक एम एच १२ ए आर ९४२५) आल्यामुळे त्याला देखील थांबवून, त्याच्या पाठीमागे पाहणी केली असता, त्यामध्ये देखील २६ लहान वासरे व ६ जर्शी गायी मिळून आल्या. टेम्पो चालकाचे नाव रामपाल दत्तात्रय खंडागळे (वय ३८ वर्षे, रा. यशवंत नगर, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर) असे सांगितले. दोन्ही चालकास त्यांच्या टेम्पोमधील जर्शी गायी व लहान वासरा बद्दल विचारपूस केली असता, त्यांनी सांगितले की, गायी व लहान वासरे हे माळशिरस व नातेपुते परिसरातून धाराशिव येथील बाबा गौस इरशाद कुरेशी यांनी विकत घेतले असून, त्यांच्याकडे घेवून जात आहे. यावेळी दोन्ही टॅम्पो मधील एकूण ४६ जनावरे असा एकूण २६ लाख ८३ हजारांचा मुद्देमाल हा जप्त केला. तीन्ही आरोपी विरुध्द पोलीस ठाणे धाराशिव शहर येथे प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध कायदा १९६० व महाराष्ट्र प्राणी संरक्षण (सुधारणा) अधिनियम २०१५ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक रितू खोखर, अपर पोलीस अधीक्षक शाफकत आमना, उप विभागीय पोलीस अधिकारी स्वप्नील राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे धाराशिव शहर येथील पोलीस निरीक्षक शकील एस. शेख व त्याच्या पथकाने आणि स्थानिक गुन्हे शाखा येथील पोलीस निरीक्षक विनोद इज्ञपवार व त्यांच्या पथकाने संयुक्तपणे केली.

# भरधाव टिप्परची दुचाकीला धडक, उपळाई येथील दोघांचा मृत्यू

आरंभ मराठी | येरमाळा





बार्शी ते कुसळंब रोडवर सोमवारी (दि.१६) दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात कळंब तालुक्यातील उपळाई येथील दोन व्यक्तींचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. भरधाव टिप्परने लुना गाडीला जोराची धडक दिल्याने गाडीवरील दोघांचा अपघातामध्ये मृत्यू झाला. याबाबत अधिक माहिती अशी की , उपळाई येथील शेतकरी नानाभाऊ शेंडगे हे बार्शी येथे फवारणी पंपाची दुरुस्ती करण्यासाठी गेले होते. पंपाची दुरूस्ती झाल्यानंतर गावाकडे येत होते. उपळाई येथीलच विनायक मुंढे व त्यांच्या पत्नी हे अपल्या आर्मी मध्ये नोकरीला असलेल्या मुलाला पाठवुन बसची वाट पाहत बार्शी येथील शितल हॉटेल समोर बसले होते .नाना शेंडगे यांनी विनायक मुंढे यांना चला मी एकटाच आहे आपण दोघे गावाकड जाऊ अशी विचारणा केल्यावर विनायक मुंढे यांनी आपल्या पत्नीला तु बसने ये मी नानाबरोबर जातो म्हणून सांगितले. पुढे कुसळंब गावाजवळ आल्यावर समोरुन भरधाव वेगाने येणाऱ्या टिप्परने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. यामध्ये दोघांचाही मृत्यु झाला. या दोघांवरही मंगळवारी (दि.१७) उपळाई येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.रमेश नानाभाउ शेंडगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून त्यांचे वडील नानाभाऊ आप्पाराव शेंडगे (वय ६१) व सोबतचे विनायक हरिदास मुंढे (वय ७१, दोघे रा. उपळाई, ता. कळंब) हे बार्शीहून लुना (क्र. एचएच२५/एएक्स २५६२) वरून गावाकडे परतत असताना कुसळंब गावाजवळ समोरून भरधाव वेगात आलेल्या टिप्पर (क्र. एमएच१३/सीयू ६०९५) ने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघाताची माहिती रमेश शेंडगे यांना त्यांच्या मित्रामार्फत मिळाल्यानंतर त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. तेव्हा परिसरात मोठी गर्दी झाली होती व लुना पूर्णतः मोडून पडलेली दिसून आली. याप्रकरणी बार्शी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# धाराशिव शहरामध्ये दिवसाढवळ्या महिलेचे गंठन हिसकावून चोरटे पसार

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव शहरात आनंदनगर पोलीस स्टेशनच्या जवळून एका पायी जाणाऱ्या महिलेचे गंठन दोन चोरट्यांनी मोटारसायकलवर येऊन चोरून नेल्याची घटना घडली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, निर्मला रविकांत देशमुख (वय ४३ वर्षे, रा. वैष्णवी नगर छायादिप लॉन्सच्या पाठीमागे धाराशिव) या मंगळवारी (दि.१७) सायंकाळी पावणे पाच वाजण्याच्या सुमारास धाराशिव शहरातील राधिका बारच्या बाजूच्या रोडवरून पायी जात होत्या. त्यावेळी अनोळखी दोन व्यक्तींनी मोटरसायकलवर येवून निर्मला देशमुख यांच्या गळ्यातील ७० हजार रुपये किंमतीचे १८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण जबरीने हिसकावून चोरटे पसार झाले. आनंदनगर पोलीस ठाण्यापासून अगदी हाकेच्या अंतरावर ही घटना घडल्यामुळे खळबळ उडाली आहे. निर्मला देशमुख यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०४(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. धाराशिव शहरात सोनसाखळी चोरट्यांनी हैदोस घातला असून, बस स्थानक परिसरात आणि शहरातील मुख्य रस्त्यावर वारंवार चोरीच्या घटना घडत आहेत. शहरात सोनसाखळी चोरट्यांची टोळी सक्रिय असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पोलीस प्रशासनाने अशा घटनांकडे गांभीर्याने लक्ष देऊन चोरट्यांच्या मुसक्या आवळण्याची गरज आहे.

# दरोड्याच्या तयारीतील तीन आरोपींच्या मुसक्या आवळल्या; दोन आरोपी फरार

## आरोपींकडून गावठी पिस्टलसह तीन जिवंत काडतुसे जप्त

आरंभ मराठी | धाराशिव



दरोड्याच्या तयारीत असणाऱ्या तीन जणांना पकडण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले. यावेळी दोन आरोपी मात्र फरार झाले. पकडलेल्या तीन आरोपींकडून गावठी पिस्टलसह तीन जिवंत काडतुसे, कोयता, दोन दुचाकी आणि एक चारचाकी गाडी ताब्यात घेण्यात आली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, धाराशिव जिल्ह्यातील चोरीच्या गुन्ह्यातील आरोपीची माहिती काढुन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती. शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्ञपवार यांच्या आदेशावरुन सपोनि अमोल मोरे, सपोनि सचिन खटके, विनोद जानराव, वाघमारे, जाधवर,चालक पोहेकॉ अरब, दहीहांडे, बोईनवाड यांचे पथक मालाविषयक गुन्ह्यातील आरोपीची माहिती काढत पेट्रोलिंग करत होते. दिनांक १७ जून रोजी रात्री साडेसात वाजता तेरणा कॉलेज येथे पथक आले असता, पथकास गोपनिय माहिती मिळाली की, विमानतळाकडे जाणाऱ्या रोडच्या बाजूला धाराशिव येथे चार ते पाच व्यक्ती एक चार चाकी कार व तीन मोटरसायकल सह अंधारामध्ये दरोडा टाकण्याच्या तयारीत संशईतरित्या थांबले आहेत. खात्रीशीर बातमी मिळाताच पथकाने लागलीच माहिती मिळालेल्या ठिकाणी जाऊन शासकीय वाहन एका जागी लावले. आणि पायी चालत जात असताना तेथे थांबलेल्या व्यक्तींपैकी दोन व्यक्तींनी पोलिसांना पाहताच मोटरसायकलवर बसून पळ काढला. खाली बसलेले इतर तीन साथीदार पळून जाण्याच्या तयारीत असताना पथकाने त्यांना ताब्यात घेतले. यावेळी धुपकिरण उर्फ अनिलशेट रामलगन चौधरी (वय ४७ वर्षे,रा.अरिवला (फुलपुर) ता. भानपुर जि. बस्ती राज्य उत्तरप्रदेश), निलेश उर्फ कांचन संभाजी चव्हाण (वय ३२ वर्षे रा. काकानगर ता. जि. धाराशिव) आणि मुकेश शाम शिंदे (वय २४ वर्षे, रा. शिंगोली ता. जि. धाराशिव) या तिघांना ताब्यात घेतले. आरोपीच्या ताब्यातून एक लोखंडी धातुचे गावठी बनावटीचे पिस्टल अंदाजे ७५,००० रुपये किंमतीचे, तीनन जिवंत काडतुसे अंदाजे ६०० रुपये, एक लोखंडी कोयता २०० रुपये, एक हयुंडाई कंपनीची संट्रो कार अंदाजे २,३०,००० रुपये व एक बुलेट मोटरसायकल अंदाजे १,५५,००० रुपये किंमतीची व होंडा ॲक्टीवा स्कुटी अंदाजे ४५,००० रुपये असा एकुण ५,०५,८०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन पोलीस ठाणे धाराशिव ग्रामीण येथे नमुद आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला. व तिन्ही आरोपींना मालासह धाराशिव ग्रामीण पोलीसांच्या ताब्यात दिले.

# तुळजापुरात भाजपला खिंडार; मीनाताई सोमाजींसह असंख्य महिला कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर तालुक्यातील भाजपला मोठा धक्का देत, भाजप महिला कार्यकारिणी सदस्य मीनाताई सोमाजी यांनी बुधवारी (दि.१८) शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. विशेष म्हणजे, त्यांनी तुळजापूरमधील असंख्य महिला कार्यकर्त्यांना सोबत घेऊन शिवसेनेत प्रवेश करून राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवून दिली. मुंबई येथे आयोजित भव्य प्रवेश सोहळ्यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मीनाताई सोमाजी यांचा शिवसेनेत प्रवेश झाला.

यावेळी शिंदे यांनी त्यांचे उत्साहात स्वागत करत, ''मी नेहमी माझ्या लाडक्या बहिणींसोबत खंबीरपणे उभा राहीन आणि त्यांना पूर्ण सहकार्य करीन,'' असा विश्वास दिला. या प्रवेश सोहळ्याचे आयोजन शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले, धाराशिव जिल्हाध्यक्ष मोहन पनुरे व नूतन तालुकाध्यक्ष अमोल जाधव यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या पक्षप्रवेश सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मीनाताई सोमाजी या मागील अनेक वर्षांपासून भाजपमध्ये सक्रिय असून महिला क्षेत्रात त्यांचे मोठे योगदान राहिले आहे. त्यांच्या अचानक शिवसेनेत प्रवेशाने भाजपच्या स्थानिक संघटनेला मोठा धक्का बसला आहे.

त्यांच्या सोबत तुळजापूर शहरातील विविध प्रभागांमधील महिला कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश करून, तालुक्यात सेनेची ताकद वाढवली आहे.



तालुकाध्यक्ष अमोल जाधव यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, ''हा पक्षप्रवेश केवळ सुरुवात आहे. लवकरच धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत तुळजापूरमध्ये एक भव्य पक्षप्रवेश मेळावा आयोजित करण्यात येणार आहे. त्या मेळाव्यात विविध पक्षांतील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करतील.'' या पक्षप्रवेश सोहळ्यास तुळजापूर शहरातील शहर प्रमुख बापूसाहेब भोसले, उपशहर प्रमुख रमेश चिवचिवे तसेच शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत घरपोच ई-केवायसी मोहीम

■ ९ हजाराहून अधिक निराधारांना होणार फायदा

■ आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचा पुढाकार

आरंभ मराठी | धाराशिव



जिल्ह्यातील गरजू लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ राज्य निवृत्तिवेतन योजनेचा लाभ अडथळ्याविना मिळावा, यासाठी आमदार व 'मित्र'चे उपाध्यक्ष राणाजगजितसिंह पाटील यांनी पुढाकार घेत शासन आपल्या दारी या संकल्पनेअंतर्गत घरपोच ई–केवायसी मोहीम राबविण्यासाठी जिल्हा प्रशासनाला स्पष्ट सूचना दिल्या आहेत.ही कारवाई १५ जून २०२५ रोजी कळंब, धाराशिव व तुळजापूर तालुक्यात घेण्यात आलेल्या 'भाजपा संकल्प से सिद्धी' अभियानातील सहा जनता दरबारांमध्ये आलेल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर करण्यात आली. या दरबारांमध्ये सुमारे २००० तक्रारी नोंदवण्यात आल्या असून, त्यापैकी बहुतांश तक्रारी संजय गांधी निराधार आणि श्रावणबाळ योजनेतील मानधन थांबण्याबाबत होत्या. या प्रकाराकडे गांभीर्याने लक्ष देत आमदार श्री. पाटील यांनी संबंधित योजनांच्या अंमलबजावणीबाबत तात्काळ माहिती घेतली व प्रशासनास योग्य ती पावले उचलण्याचे निर्देश दिले.सामाजिक न्याय विभागाच्या या योजनांचा मुख्य उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल, अडचणीत असलेल्या आणि सामाजिक आधारापासून वंचित घटकांना मदत करणे हा आहे. या योजनांतर्गत निराधार पुरुष आणि महिला, अपंग, गंभीर आजारांनी त्रस्त नागरिक, अनाथ, विधवा तसेच ६५ वर्षांवरील वृद्ध नागरिकांना दरमहा ठराविक रक्कम थेट बँक खात्यात जमा केली जाते.जिल्ह्यात संजय गांधी निराधार योजनेचे ४१,२३० लाभार्थी आहेत, त्यापैकी ८,०९७ लाभार्थ्यांची ई–केवायसी प्रक्रिया अद्याप अपूर्ण आहे. तसेच श्रावणबाळ योजनेचे ५१,६०४ लाभार्थी असून त्यात १,२४० लाभार्थी ई–केवायसी न झाल्यामुळे वंचित आहेत. ई–केवायसी न झाल्यास लाभार्थ्यांचे मानधन थांबते, यामुळे ही प्रक्रिया पूर्ण करणे अत्यावश्यक झाले आहे. ही गंभीर बाब लक्षात घेता आमदार श्री. राणाजगजितसिंह पाटील यांनी जिल्हाधिकारी, निवासी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांच्याशी दूरध्वनीद्वारे संवाद साधून, या विषयावर तातडीने कृती करण्यास सांगितले. त्यानंतर, ग्रामीण भगत ग्रामसेवक, तलाठी तसेच शहरी भागासाठी नगर परिषदेचे मुख्याधिकारी व स्थानिक कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून ई–केवायसी प्रक्रिया घरोघरी जाऊन पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले गेले.या उपक्रमात भाजपचे स्थानिक कार्यकर्ते गावपातळीवर सहकार्य करणार असून, गरजू लाभार्थ्यांनी त्यांच्याशी थेट संपर्क साधण्याचे आवाहनही आमदार पाटील यांनी केले आहे.

CMYK

दैनिक आरंभ मराठी

संपादकीय

गुरूवार दि.19 जून 2025

# ..अखेर पळसप ग्रामपंचायतने विशेष ग्रामसभा घेऊन पोकरा योजनेसाठी ग्राम समिती केली गठीत

## आरंभ मराठीच्या वृत्तानंतर ग्राम प्रशासनाला आली जाग

आरंभ मराठी | पळसप

**धाराशिव तालुक्यातील पळसप येथे अनेक दिवसांपासून ग्रामसभाच होत नसल्याने अनेक शासकीय बाबी संबंधी ठराव आणि समित्या निवड न झाल्याने पुढील कामकाजासाठी अडथळा निर्माण होत असल्याचे वृत्त दिनांक ६जून रोजी प्रसिद्ध झाले होते. तसेच त्या संबंधी दै.आरंभ मराठीच्या प्रतिनिधिद्वारा कृषी विभाग आणि ग्रामपंचायत कार्यालयाशी संपर्क केला होता. त्यावेळी चार दिवसात ग्रामसभेची नोटीस काढून ग्राम सभा घेण्यात येईल असे आश्वासन दिले होते. केवळ समिती नसल्यामुळे पोकरा योजनेच्या कामांना गती मिळत नसल्याच्या तक्रारी वारंवार केल्या जात होत्या.**


दैनिक आरंभ मराठी

ग्रामसभेअभावी विकास कामाच्या विविध समित्या व ठराव घेण्यास दिरंगाई

पळसप ग्रामपंचायतीमध्ये अंतर्गत राजकीय कुरापतीमुळे जनता वेठीस

आरंभ मराठी | पळसप

सूचना देऊनही त्याचे पालन नाही

लवकरच ग्रामसभा घेण्यात येईल



सोमवारी (दि.१६) सरपंच सिद्धेश्वर काळे यांच्या अध्यक्षतेखाली ग्राम सभा घेऊन पळसप गावची निवड नानाजी देशमुख कृषी संजीवनी या योजनेसाठी झाल्याने त्याचे काम काज सुरळीत पार पाडण्यासाठी सरपंचांच्या अध्यक्षतेखाली नानाजी देशमुख ग्राम विकास समिती गठित करण्यात आली. कृषी विभागाच्या परिपत्रकानुसार व शासनाच्या नियमानुसार ही समिती गठित करण्यात आली. या मध्ये पदसिध्द अध्यक्ष म्हणून गावचे सरपंच सिद्धेश्वर काळे, तसेच उपसरपंच राम लाकाळ, ग्रा सदस्य सरस्वती लिंबराज सोनपारखे, शाईन युसूफ पटेल, सरोजा सुरेश निकम तसेच गावातील इतर सदस्यामध्ये प्रमोद अरविंद लाकाळ, विकास श्रीमंत झांजे, सरस्वती कल्याण लाकाळ, भागवत उत्तम लाकाळ, रमेश नानासाहेब नरवडे, निशिगंधा आकृर सरडे, सुमन श्रीधर मगर, सोजर मच्छिंद्र माळी या १३ सदस्यांची ग्रामसभेमध्ये सर्व गावकऱ्यांच्या सहमतीने निवड करण्यात येऊन तशा पद्धतीचा ग्रामसभेत ठराव घेण्यात आला. या वेळी ग्रामसेवक कदम, उपसरपंच राम लाकाळ, कृषी मंडळ अधिकारी भूतेकर , कृषी पर्यवेक्षक वरपे, कृषी सहाय्यक मगर, तलाठी आडगळे तसेच गावातील शिवसेना नेते अजित लाकाळ, माजी उपसरपंच प्रमोद लाकाळ, तंटामुक्त अध्यक्ष विजय करंजकर, ग्रा प सदस्य बबन निकम, अच्युत गजधने, युसूफ शेख तसेच गावातील प्रवीण लाकाळ, सरताज पटेल, दयानंद नरवडे, विजय माळी, महादेव निकम, श्रीनिवास लाकाळ , दयानंद लाकाळ, फुलचंद फुटाणे, रमेश लाकाळ ,अप्पा भोंडे ईत्यादीसह गावातील नागरिक उपस्थित होते. या दरम्यान गावातील जनतेने अध्यक्षांना गावातील समस्या विषयी प्रश्नांचा भडीमार केला. मात्र ग्रामसभेच्या अध्यक्षांना त्यांचे समाधान करता आले नाही. शेवटी ही ग्रामसभा पोकरच्या ग्रामसमितीच्या निवडी संदर्भात असून पुढच्या काही दिवसात गावातील सर्व कामकाज, गावकऱ्यांच्या समस्या आणि विविध ठराव या संदर्भात ग्रामसभेची नोटीस काढून ग्रामसभा घेण्यात येईल असे सरपंचकडून गावकऱ्यांना सांगून ग्रामसभा संपन्न झाल्याचे सांगण्यात आले.

# ढोकी येथे भारतीय जनता पार्टीचा जनता दरबार; नागरिकांच्या तक्रारींचे निवारण



आरंभ मराठी | ढोकी

मोदी सरकारच्या ११ वर्ष 'संकल्प ते सिद्धी' अभियानाअंतर्गत तालुक्यातील पहिला जनता दरबार ढोकी जिल्हा परिषद गटात जिल्ह्याचे नेते मित्रा चे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील व जिल्हा अध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून ढोकी येथे संपन्न झाला. नागरिकांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी व शासकीय योजनांची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्य उपस्थिती ॲड. दत्तात्रय देवळकर माजी सभापती जिल्हा परिषद धाराशिव अध्यक्षस्थानी ग्रामीण पश्चिम मंडल अध्यक्ष, अनिल भाऊ भुतेकर, निहाल काझी, झुंबर आबा बोडके, गुणवंत सुतार, अंकुश जाधव सर, दत्ता सर हाजगुडे, सचिन लोमटे, शहराध्यक्ष प्रभाकर गाढवे, भाजपा युवा मोर्चा तालुकाध्यक्ष विकी लंगडे, विलास रसाळ, विकास शेंडगे,लहू शिंदे, गणेश शिंदे, अच्युत (मामा) जराड, एजाज भाई काजी, पवन नाना वाघमोडे, राजू रसाळ, नारायण कसबे, शदत्ता कसबे, शिराज भाई मुल्ला पटेल,शिव सुरवसे, हनुमंत कावळे, जीवन कावळे, रेहान काझी, भुजंग शेंडगे, नेताजी गडकर, लाला शिंदे, कोतवाल, विनोद कावळे, शहाजी कांबळे, रंगनाथ कांबळे, ठाकूर, गोपाळ माळी, मंगेश जाधव खंडू पवार , भगवान पवार, योगेश पवार, ज्ञानेश्वर भोसले, दिगंबर काळे, बालाजी माळी, धर्मराज लोमटे, संजय पवार, विनोद कावळे, बालाजी कैंचे इत्यादी उपस्थित होते. या जनता दरबारात लोकांची कामे मार्गी लावण्यासाठी राणा पाटील यांचे स्वीय सहाय्यक रविराज चौगुले, तसेच डॉ. गुरुप्रसाद चिवटे, सचिन लोमटे यांनी नागरिकांच्या समस्या लिखित स्वरूपात घेतल्या. यावेळी सर्वसामान्यांसाठी जनता दरबार घेतल्याबद्दल शेतकरी व सर्वसामान्य नागरिक यांच्याकडून समाधान व्यक्त करण्यात आले.

# चिमुकल्यांच्या किलबिलाटाने शाळेचा परिसर गजबजला

आरंभ मराठी | नारंगवाडी

उन्हाळी सुट्टीच्या प्रदीर्घ कालावधीनंतर चिमुकल्यांच्या किलबिलाटाने नारंगवाडी येथील श्री जयराम विद्यालयात शाळेचे आवार गजबजले आणि पुन्हा एकदा शाळा सुरू झाली. शाळेत पहिले पाऊल ठेवलेल्या चिमुकल्यांना शाळेची गोडी निर्माण व्हावी यासाठी पुष्पगुच्छ देत मुलांचा शाळेचा पहिला दिवस अविस्मरणीय करण्यात आला. शाळेच्या आवारात काढलेल्या रांगोळ्या, तोरण, फुलांनी सजविलेले वर्ग आणि संगीताच्या सुरावटीने मुलांचे स्वागत करण्यात आले. नवागतांचा हा स्वागत सोहळा सर्वत्र रंगला होता. गुलाबपुष्पाने मुलांचे चेहरे खुलले असल्याचे चित्र दिसत होते. भारत शिक्षण संस्था संचलित श्री जयराम विद्यालय नारंगवाडी येथे नारंगवाडी गावचे सरपंच शेखर घंटे व पोलीस पाटील



हेमंत पाटील प्रशालेचे मुख्याध्यापक अजय पवार यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून, मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. शाळेचा पहिला दिवस आनंदी वातावरणात आणि ऊत्साहात साजरा करण्यात आला.

# ट्रॅक्टरमधून वाजत गाजत मिरवणूक काढत नव विद्यार्थ्यांचे स्वागत

आरंभ मराठी | आलुर

उमरगा तालुक्यातील आलुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मोठ्या उत्साहात शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ ला सुरवात झाली. सर्व प्रथम नवागतांचे पुष्पगुच्छ, पुष्पहार, फुगा, चॉकलेट व बर्थडे कॅप नेसवून वर्ग शिक्षिका आष्टगी यांनी औक्षण केले. नविन विद्यार्थ्यांची गावातील प्रमुख मार्गावरून सजविलेल्या ट्रॅक्टर मधुन वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकी नंतर शाळेत पालक, माता पालक, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक, मोफत गणवेश, मोफत बुट व पायमोजे यांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते झाले. तसेच पालकमंत्री, उमरगा-लोहारा मतदारसंघाचे आमदार व मुख्य कार्यकारी अधिकारी धाराशिव यांच्या शुभेच्छा संदेशाचे वाचन केले. तसेच शैक्षणिक साहित्यांनी सजविलेल्या पहिली वर्गाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. वर्ग पाहुन




उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समिती प्रयत्न करत होती. सोमवारी शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना गोड पदार्थ जिलेबी वाटप आदर्श शिक्षक जि. प. प्राथमिक शाळा वरनाळचे मुख्याध्यापक श्रीकांत कनकधर तर्फे देण्यात आले. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शट्टप्पा धुत्तरगे, उपाध्यक्ष अनिल मरबे, सदस्य हणमंत बिराजदार, महादेव तळीकर, संजय कासार, संजय सावरगे व माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळा व्यवस्थापन समितीच्या प्रयत्नाने प्रवेशोत्सव यशस्वी झाला. शाळेतील शिक्षक पुंडकरे, आष्टगी, घोडके यांच्या परिश्रमाने कार्यक्रम सुंदर झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुंडकरे केले आभार मुख्याध्यापक पाटील मानले.

# पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांची बैलगाडीतून मिरवणूक

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा तालुक्यातील रामपूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. यामध्ये नवागत मुलांचे मान्यवरांच्या शुभ हस्ते स्वागत करण्यात आले. सेल्फी पॉइंट येथे त्यांचा सेल्फी घेण्यात आला. त्यानंतर बैलगाडीतून इयत्ता पहिलीचा प्रवेश घेतलेल्या नवागत मुलांची संपूर्ण रामपूर गावातून मिरवणूक काढण्यात आली. मान्यवरांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक वितरण करण्यात आले. यावेळी अध्यक्ष हनमंत दासमे, उपाध्यक्ष कुंभार शाळा व्यवस्थापन समिती सदस्य गोविंद



भोसले व मान्यवर आणि पालक उपस्थित होते. मुलांना शालेय पोषण आहारासोबत सोनपापडी देण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वामी विकास यांनी केले. आभार गायकवाड बालाजी यांनी मानले. यावेळी शिंदे महादेव, सहशिक्षक भोसले धर्मराज, कांबळे चंद्रशेखर, कांबळे तानाजी, वेल्हाळ स्नेहा, सर्व पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# आगाशे यांचा वाढदिवस मित्र परिवाराच्या वतीने साजरा



आरंभ मराठी | तेर

धाराशिव तालुक्यातील तेर येथील ग्रामपंचायत सदस्य व तेरणेचा राजा अर्थमुव्हर्सचे मालक अविनाश आगाशे यांचा वाढदिवस मित्र परिवाराच्या वतीने साजरा करण्यात आला. यावेळी केक कापून, पुष्पहार व वृक्षाचे रोपटे देऊन वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करण्यात आले. खा.ओमराजे निंबाळकर यांच्यासह अनेकांनी समाज माध्यमातून, फोन करून, प्रत्यक्ष भेटून आगाशेयांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# आलुर जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळेत प्रवेशोत्सवा निमित्त विविध उपक्रमाचे आयोजन

आरंभ मराठी | आलुर

उमरगा तालुक्यातील आलुर येथे शाळेच्या पहिल्या दिवशी जि.प.प्राथमिक कन्या शाळेत प्रवेशोत्सव सन २०२५ -२०२६ निमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले. सोमवारी नवागत बालकांचे स्वागत फुगे, गुलाब पुष्प, चॉकलेट, पाठ्यपुस्तके, पेन, गणवेश, बूट सॉक्स यांचे वाटप शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हणमंत शंके, उपाध्यक्ष ज्योती बोळदे व सर्व सदस्य, पालक, ग्राम पचांयत सदस्य, माता भगिनी, गावकरी यांच्या हस्ते स्वागत समारंभ बहारदार आनंदी वातावरणात करण्यात आला.पालक श्रीकांत कनकधर यांनी सर्व विद्यार्थ्यांनींना गोड पदार्थ जिलेबी वाटप केली.




शाळेच्या प्रांगणात ग्रामपंचायतीच्या वतीने पेव्हर ब्लॉक बसविल्याबद्दल यासाठी प्रयत्न करणाऱ्या शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हणमंत शंके, ग्रामपंचायत सदस्य अण्णाराव पाटील यांचा शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. इयत्ता दुसरी ते सातवी सर्व मुलींना गणवेश व बूट सॉक्स व पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आले. आलुर येथील विविध जि.प शाळांमध्ये नविन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत करुन प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. बहारदार कार्यक्रम मु.अ. चिलगर एम.एस. व सर्व शिक्षकवृंद यांच्या सहकार्याने पार पडला..

# आषाढी एकादशीच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी महापूजेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निमंत्रण

आरंभ मराठी | मुंबई

श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्यावतीने निमंत्रण देण्यात आले. यंदाच्या आषाढी एकादशी दिवशी रविवार, दि. ६ जुलै, २०२५ रोजी पहाटे २.२० वाजता मुख्यमंत्री महोदय व मानाचे वारकरी यांच्या हस्ते सपत्नीक श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेची शासकीय महापूजा करण्यात येईल. या महापूजेचे निमंत्रण देण्यासाठी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज-औसेकर यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री फडणवीस यांची वर्षा निवासस्थान येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांचा मंदिर समितीच्या वतीने विणा, वारकरी पटका, श्रींची मूर्ती, उपरणे, चिपळ्या देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला



नडगिरे, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, ॲड. माधवी निगडे, अतुलशास्त्री भगरे गुरुजी, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके उपस्थित होते. मंदिर समितीमार्फत आषाढी यात्रेच्या नियोजनाची तसेच श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर जतन व संवर्धन कामाची तसेच विठ्ठल रुक्मिणी मातेचे जलद व सुलभ दर्शन होण्याच्या दृष्टीने राबवण्यात आलेल्या टोकन दर्शन प्रणालीची तसेच अन्य व्यवस्थेबाबत माहिती देण्यात आली.

# तेरमधील शेतकऱ्यांना बीजप्रक्रियेचे मार्गदर्शन कृषिदूतांकडून प्रात्यक्षिकाद्वारे माहिती




आरंभ मराठी | धाराशिव

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर तेर परिसरातील शेतकऱ्यांना सोयाबीन पिकावरील बीजप्रक्रियेचे महत्त्व पटवून देण्यासाठी कृषिदूतांनी विशेष अभियान राबवले. या उपक्रमात शेतकऱ्यांना बीजप्रक्रिया कशी करावी, त्याचे फायदे काय आहेत, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या शैक्षणिक उपक्रमाचे समन्वयक व्यवस्थापक हरि घाडगे, प्रमुख देवानंद शेटे, मृदा विज्ञान विषयाच्या प्रिया गोटे, ॲग्रोनॉमीचे प्रताप खोसे, पॅथोलॉजीचे प्रा. प्रविण माळी व कीटकशास्त्राचे अक्षय शिंदे हे होते. कृषिदूत प्रणय कोकाटे, जगदिश बसाटे, रमन घोरपडे, अशोक यादव, अमोल मायकर, साहित सांगुळे व संकेत सांगुळे यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. या प्रसंगी मार्गदर्शन करताना तज्ज्ञांनी सांगितले की, बीजप्रक्रिया न केल्यास बियाण्यांची उगमक्षमता कमी होते आणि उत्पादनात घट येते. योग्य बीजप्रक्रियेने बियाण्यांपासून होणाऱ्या तसेच जमिनीत असणाऱ्या बुरशीजन्य रोगांपासून पीक सुरक्षित राहते. तसेच, जमिनीत आढळणाऱ्या कीटकांचा प्रादुर्भाव कमी होतो. विशेषतः रसशोषक किडी आणि खोड माशी यांचा प्रादुर्भाव ३०-३५ दिवसांपर्यंत टाळता येतो. त्यामुळे कीडनाशकांवर होणारा खर्च वाचतो आणि उत्पादन खर्च कमी होतो. पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया केल्यास पिकाची सशक्त वाढ होते आणि उत्पादनात वाढ होते, असा विश्वास कृषिदूतांनी व्यक्त केला.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव ) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.- 2023/90078

# पीक विम्यापासून वंचित असलेल्या ७५ हजार शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी जिल्हास्तरीय समितीची बैठक आयोजित करा

आरंभ मराठी | धाराशिव




खरीप २०२४ मधील पीक काढणी कव्हर अंतर्गत पिक विमा नुकसान भरपाई पासून वंचित असलेल्या ७५ हजार शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी जिल्हास्तरीय समितीची बैठक आयोजित करून पिक विमा कंपनीला आदेश द्यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्याकडे केली आहे. खरीप २०२४ मध्ये धाराशिव जिल्ह्यातील ७ लाख १९ हजार १६७ अर्जदार शेतकऱ्यांनी पिक विमा भरला होता. त्यासाठी एचडीएफसी या पिक विमा कंपनीला शेतकरी हिस्सा राज्य हिस्सा व केंद्र शासनाचा हिस्सा मिळून ५९६ कोटी ९५ लाख रुपये विमा हप्ता देय रक्कम आहे. गेल्या वर्षी धाराशिव जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी अवकाळी पाऊस झाल्याने पिकाचे नुकसान झाले. शेतकऱ्यांनी ७२ तासात नुकसानीच्या रीतसर पूर्व सूचना कंपनीला दिल्या होत्या. त्यानंतर कंपनीने सर्वेक्षण करून ५ लाख १९ हजार ७४७ अर्जदार शेतकऱ्यांना आतापर्यंत २१८ कोटी ८ लाख रुपयांचे वाटप केलेले आहे. तसेच ७६९९ शेतकऱ्यांची पिक विमा नुकसान भरपाईची रक्कम १००० पेक्षा कमी असल्याने राज्य शासनाकडून सबसिडी आल्यानंतर त्याचेही वाटप करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले जी रक्कम १ कोटी २५ लाख इतकी आहे. पीक काढणी कव्हर अंतर्गत (पोस्ट हार्वेस्टिंग) अद्यापही ७५ हजार शेतकरी पिक विमा नुकसान भरपाई मिळण्यापासून वंचित आहेत. केंद्र शासनाचे ३० एप्रिल २०२४ चे परिपत्रक लागू झाल्याने शंभर रुपये नुकसान झाले तरी केवळ २५ रुपयेच नुकसान देण्याचे सूत्र निश्चित केले गेले आहे. पीक काढणी कव्हर अंतर्गत या सूत्रानुसार जवळपास ४५ हजार शेतकऱ्यांना पिक विमा मिळणे अद्यापही बाकी आहे. तसेच ३० हजार शेतकऱ्यांना वैयक्तिक पूर्वसूचनांच्या आधारे काढणी कव्हर अंतर्गत पिक विमा मिळणे अद्याप बाकी आहे. अशा ७५ हजार शेतकऱ्यांचे अद्याप जवळपास १२ कोटी रुपये येणे बाकी आहे. यावर्षी धाराशिव जिल्ह्यातील एकूण पिक विमा नुकसान भरपाई जवळपास २३१ कोटी ८५ लाख रुपये इतकी आहे. ३० एप्रिल २०२४ च्या परिपत्रकाने धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे ७२० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. या परिपत्रकानुसार शंभर रुपये नुकसान भरपाई झाली तर केवळ २५ रुपये देण्याची तरतूद आहे. धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना यावर्षी २३१ कोटी रुपयांचे वाटप होणार आहे.

## विमा कंपनीने नुकसान भरपाई शेतकऱ्यांना द्यावी

पोस्ट हार्वेस्टिंग अर्थात पीक काढणी कव्हर अंतर्गत जिल्ह्यातील ७५ हजार शेतकऱ्यांची जवळपास १२ कोटी रुपये रक्कम मिळणे बाकी आहे. पिक विमा कंपनीच्या म्हणण्यानुसार ५९६ कोटी पैकी राज्य शासनाकडून अद्याप २१३ कोटी रुपये येणे बाकी आहे. त्यामुळे सदरील रक्कम शेतकऱ्यांना वाटप झाली नाही. वर्तमानपत्रातून राज्य शासनाने दुसरा हप्ता कंपनीला दिल्याचे वाचनात येत आहे. कंपनीने तातडीने शेतकऱ्यांना पीक नुकसान भरपाई देऊन पेरणीसाठी त्यांना आर्थिक दिलासा द्यावा.



–अनिल जगताप
सामाजिक कार्यकर्ते.

## तालुकानिहाय मिळालेली पिक विमा नुकसान भरपाई

| | |
|---|---|
| भूम | १७ कोटी १ लाख |
| धाराशिव | ५० कोटी ५५ लाख |
| कळंब | ३६ कोटी २८ लाख |
| लोहारा | १७ कोटी |
| परंडा | ८ कोटी ५६ लाख |
| तुळजापूर | ४५ कोटी ५९ लाख |
| उमरगा | २५ कोटी ९६ लाख |
| वाशी | १७ कोटी ७२ लाख |

असे एकूण २१८ कोटी ८ लाख रुपये वाटप करण्यात आलेले आहेत.

## विविध वृत्त

### डॉ.व्हि. पी. शैक्षणिक संकुलात २० दिवस चालणार वृक्षारोपणाची मोहीम

आरंभ मराठी | धाराशिव

पर्यावरणाचे संतुलन हे मानवाला आरोग्यदायी जीवन जगण्यासाठी आवश्यक आहे. त्यादृष्टीकोनातुन पर्यावरणाचे महत्व अनन्यसाधारण आहे. म्हणूनच पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धनाच्या जाणीव जागृतीसाठी डॉ. प्रतापसिंह पाटील व करण प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.व्ही पी शैक्षणिक संकुल, छत्रपती संभाजीनगर रोड येथे पर्यावरण दिनी ६ जूनपासून सुरु झालेली वृक्षारोपण मोहीम २६ जूनपर्यंत सुरु राहणार आहे. या कालावधीमध्ये संकुलातील सर्व महाविद्यालयाच्यावतीने वृक्षारोपण करण्यात येणार आहे. १६ रोजी कृषी महाविद्यालयाच्या वतीने संकुलातील प्रक्षेत्रावर विविध प्रकारच्या वृक्षांचे रोपण करून पर्यावरणाची जबाबदारी पार पाडण्यात आली. यावेळी कृषी महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी प्रा. हरी घाडगे, प्रा. डॉ. ए ए गांदले, प्रा. डॉ.आर आर इंगळे, प्रा. डी एस शेटे, प्रा. ए एस शिंदे, प्रा. पी पी म ाळी, प्रा. ए डी डोके, प्रा. एन एम मुंडे, बालाजी मुंढे, विलास तौर तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### ईट येथे प्रभात फेरी काढत नवीन प्रवेशधारक चिमुकल्यांची रथातून मिरवणूक



आरंभ मराठी | भूम

ईट येथील पी.एम. श्री.जिल्हा परिषद प्रशालेच्या वतीने शाळेच्या पहिल्या दिवशी अनोखा उपक्रम राबवून लहान लहान चिमुकल्यांचे भव्य दिव्य असे स्वागत करण्यात आले. ईट येथील जिल्हा परिषद शाळा गुणवत्तेच्या दृष्टीने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून धाराशिव जिल्ह्यात अग्रेसर आहे. शाळेची शैक्षणिक गुणवत्ता चांगल्या प्रकारे असल्याने या शाळेत नवीन प्रवेशासाठी गर्दी होत आहे. शाळेच्या पहिल्याच दिवशी शाळेच्या वतीने नवीन प्रवेश धारक विद्यार्थ्यांना रथामध्ये बसून गावात प्रमुख रस्त्याने प्रभात फेरी काढून भव्य अशी मिरवणूक काढली. यावेळी विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. त्याचबरोबर मुलींचे स्वागत देखील आगळ्यावेगळ्या पद्धतीने करण्यात आले. जि.प. प्रशाला पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांसह पालकांनी गर्दी केली होती. शाळेच्या पहिल्या दिवशीच आनंददायी वातावरणात विद्यार्थी, पालक, शिक्षक वर्ग दिसून येत होता.

### बुकनवाडीत शालेय साहित्याचे वाटप; गुणवंत विद्यार्थ्यांचाही सत्कार



आरंभ मराठी | तेर

शिवप्रताप सामाजिक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बुकनवाडी यांच्या वतीने बुकनवाडी येथील जि. प. प्रा. शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. तसेच गावातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना वही, पेन वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी भोसले तर प्रमुख पाहुणे विष्णू एडके इंद्रजित बुकन उपस्थित होते. मुख्याध्यापक दिपक ठोंबरे तसेच शिक्षक पडवळ सर, काटे सर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम घेण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाविषयी आवड निर्माण व्हावी या अनुषंगाने संस्थेने हा उपक्रम राबविल्याचे सांगण्यात आले. गावातील होतकरू विद्यार्थी मेघराज चामे हा विद्यार्थी वैद्यकीय प्रवेशासाठी पात्र ठरल्यामुळे व विद्यार्थिनी मधु नागलबोने हिची लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत महसूल सहाय्यक या पदावर निवड झाल्याबद्दल संस्थेचे सचिव सुधाकर बुकन यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शेवटी संस्थेच्या कार्यकर्त्या मोक्षदा मारवाडकर आणि राणी वाघमोडे यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

### येरमाळा येथील नदीम मुलानी यांची शिवसेना सचिवपदी नियुक्ती



आरंभ मराठी | येरमाळा

कळंब तालुक्यातील येरमाळा येथील नदीम मुलाणी यांची कळंब तालुका शिवसेना सचिव पदी (उ.बा.ठा.) निवड करण्यात आली असून, या निवडीमुळे सर्वसामान्य कार्यकर्त्याला न्याय मिळाला असल्याने मुलानीचे कौतुक केले जात आहे. शिवसेना (उ.बा.ठा.) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने आणि खासदार ओमराजे निंबाळकर आणि आमदार कैलास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या नुकत्याच जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये कळंब तालुका सचिव म्हणून कळंब तालुक्यातील येरमाळा येथील नदीम दस्तगीर मुलानी यांच्यावर जबाबदारी सोपवली असून राजकारण आणि समाजकारण यामध्ये तळमळीने आणि निष्ठेने काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्या आदेशाने ही जबाबदारी सोपवली आहे. गेल्या अनेक वर्षापासून नदीम मुलाणी हे शिवसेनेचा प्रचार व प्रसार जोमाने करत निराधार लोकांसाठीच्या योजनेचा, शेतकऱ्यांसाठीच्या योजनांचा लाभ लोकांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. तसेच सर्व शासकीय योजनांची माहिती तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम करत आहेत. निवडीमुळे शिवसैनिक व युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून विविध सामाजिक, राजकिय व सांस्कृतिक क्षेत्रांमधुन त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# मुरुम शहरात गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा उत्साहात

आरंभ मराठी | मुरुम






मुरुम शहरातील छत्रपती संभाजी नगर भागातील ज्युनिअर कॉलेजच्या सभागृहात सोमवारी (ता.१६ ) छत्रपती संभाजी राजे ग्रुपच्या वतीने दहावी व बारावीच्या परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार रफिक पटेल हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून आप्पासाहेब सूर्यवंशी, विजयकुमार देशमाने, भाजप मुरुम मंडळ अध्यक्ष गणेश अंबर, माजी नगरसेवक दत्तात्रय इंगळे, चंद्रशेखर मुदकन्ना, शिवसेना उपतालुकाप्रमुख राजेंद्र शिंदे, मराठा सेवा संघाचे शहराध्यक्ष श्रीधर इंगळे व शिक्षिका श्रीमती जोशी यांची उपस्थिती लाभली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन करत प्रेरणादायी विचार मांडले. विद्यार्थ्यांनीही आपल्या मनोगतातून अनुभव, स्वप्ने व भविष्यातील उद्दिष्टे उलगडत उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमात आकाश शिंदे, आकाश जगदाळे, मल्लू तडकले, अक्षय शिंदे, प्रथमेश राजपूत, जिगर पवार, सुनील जाधव, बंटी चौगुले, सुमित शेळके, अंकुश शिंदे, प्रदीप शिंदे, प्रथमेश शिंदे, मंगेश शिंदे यांसारख्या छत्रपती संभाजी राजे ग्रुपच्या सदस्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या यशाला अधिक बळ मिळावे, त्यांच्या प्रेरणेला नवी दिशा मिळावी या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाबद्दल उपस्थित मान्यवरांनी सचिन शिंदे पाटील व ग्रुपचे कौतुक केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी निश्चितच मार्गदर्शक ठरेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

# राईट टू गिव्ह अप टॅबमुळे शिष्यवृत्ती अर्ज रद्द झालेल्या विद्यार्थ्यांना अंतिम संधी

## ३० जून २०२५ पर्यंत अर्ज पुन्हा सादर करण्याचे आवाहन

आरंभ मराठी | धाराशिव

महाडीबीटी पोर्टलवरील Right to Give Up टॅब अंतर्गत चुकून किंवा अनावधानाने पर्याय निवडल्यामुळे अनुसूचित जाती प्रवर्गातील अनेक विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज रद्दबातल झाले होते. या पार्श्वभूमीवर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अशा विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्याची अंतिम संधी राज्य शासनाने उपलब्ध करून दिली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३–२४ व २०२४–२५ साठी भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती,शिक्षण फी व परीक्षा फी योजना, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना आणि वस्तीगृहातील निर्वाह भत्ता आदी योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज Revert Back करण्याची सुविधा महाविद्यालयाच्या प्राचार्य लॉगिनमध्ये (Principal Login ) उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांशी तात्काळ संपर्क साधून आपले अर्ज Revert Back करून घ्यावेत. हे अर्ज विद्यार्थ्याच्या स्वतःच्या लॉगिनमधून दि.३० जूनपर्यंत फेर सादर करणे अनिवार्य आहे.निर्धारित वेळेत अर्ज सादर न केल्यास शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही, याची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची असेल,असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त सचिन कवले यांनी केले आहे.

# जिल्ह्यात 'स्टॉप डायरिया' अभियानाची प्रभावी अंमलबजावणी सुरू

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव जिल्ह्यात १६ जूनपासून ३१ जुलैपर्यंत ग्रामीण भागात ''स्टॉप डायरिया'' ही मोहीम राबवली जाणार असून बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत. जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हा सुकाणू समितीची बैठक पार पडली. या बैठकीत अभियानाच्या अंमलबजावणीसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शेलेंद्र चव्हाण, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकुरकर, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. कुलदीप मिटकरी, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शिवाजी फुलारी, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.विनयशील कुलकर्णी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे अतिसारामुळे होणाऱ्या बालमृत्यूचे प्रमाण शून्यावर आणणे.देशात ५ वर्षांपर्यंतच्या मुलांमध्ये अतिसार हे मृत्यूचे एक प्रमुख कारण असून, उन्हाळा आणि पावसाळ्यात हे प्रमाण अधिक असते. त्यामुळे या कालावधीत जनजागृतीसह प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे गरजेचे ठरते. अभियानांतर्गत पाच वर्षांखालील मुलांना ओआरएस आणि झिंकचे मोफत वितरण केले जाणार असून, ते लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी आरोग्य यंत्रणा सतर्क राहणार आहे. पालक आणि मुलांची काळजी घेणाऱ्या व्यक्तींना योग्य मार्गदर्शन आणि समुपदेशन करण्यात येणार आहे.यावर्षीच्या अभियानाचे घोषवाक्य आहे ''अतिसारावर करा मात, स्वच्छता व ओआरएसची घेऊनी साथ''. पावसाळ्यात दूषित पाण्यामुळे जलजन्य आजारांची वाढ होते. त्यामुळे गावागावातील अंगणवाड्या, प्राथमिक आरोग्य केंद्रे,शाळा आणि शासकीय कार्यालयांमध्ये पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत.पाण्याचे निर्जलीकरण करून वापरण्यास लोकांना प्रवृत्त केले जात आहे. अभियानाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषद आरोग्य विभाग,पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग,महिला व बालकल्याण विभाग,शिक्षण विभाग आणि ग्रामपंचायत विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने उपक्रम राबवले जातील. गावपातळीवर जनजागृतीसाठी विविध कार्यक्रम, माहितीपत्रके,चर्चासत्रे यांचे आयोजन केले जाणार आहेत,अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ सतिश हरीदास यांनी दिली आहे.

# कसगी येथील श्री सिद्धेश्वर विद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

आरंभ मराठी | उमरगा



श्री सिद्धेश्वर विद्यालय कसगी ता.उमरगा येथे शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी शासनाच्या निर्देशाप्रमाणे विद्यालयात प्रथम दिनी प्रवेशोत्सव कार्यक्रम घेऊन विद्यालयात नवागत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ आणि शालेय अध्यापन पुस्तके देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक राजा माशाळे, संस्थेचे संचालक बसवराज कुंभार, सहशिक्षक भाऊसाहेब पाटील, प्राध्यापिका मेहकरकर त्यांच्या हस्ते विद्यालयातील इयत्ता पाचवी ते आठवी नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. महाराष्ट्र कर्नाटक राज्याच्या सीमा वरती भागात गुणवत्ता पूर्ण शिक्षण देणाऱ्या या शिक्षणा संस्थेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, शासनाच्या विविध योजना विद्यार्थ्यांना देऊन विद्यार्थ्यांचे हित जोपासत, मोफत पाठ्यपुस्तक, ई लर्निंग सुविधा, आधुनिक शिक्षण, शिष्यवृत्ती योजना, स्पर्धा परीक्षेची तयारी, विविध खेळाची तयारी, वार्षिक स्नेहसंमेलन, शैक्षणिक सहल, शालेय पोषण आहार योजना भारत स्काऊट गाईड शिक्षण, कला शाखेतील इंटरमीडिएट एलिमेंटरी, एन एम एम एस स्पर्धा परीक्षा दर्जेदार शिक्षण, परगावच्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह या सुविधा आहत. या सुविधेमुळे कसगी गावच्या आजूबाजूच्या परिसरातील विद्यार्थ्याबरोबर कर्नाटक राज्यातील आळंगा, शिरूर, गदलेगाव, अणूर, तुगाव, साहेब जवळगा, खेडेगावातील विद्यार्थी विद्यालयातील सर्व सोयी सुविधा आणि गुणवत्ता पूर्ण शिक्षण पाहून पहिल्याच दिवशी विक्रमी प्रवेश घेतला आहे. कार्यक्रमाच्या वेळी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी बांधव उपस्थित होते.

# अंजुमन वेल्फेअर सोसायटीकडून सह्याद्री अंकुर शिशुगृहाला मदत

आरंभ मराठी | धाराशिव




जन्मत:च मायेचा आधार हरवलेल्या निरागस चिमुकल्यांना जीवदान देणाऱ्या सह्याद्री अंकुर शिशुगृहास अंजुमन वेल्फेअर सोसायटीच्या वतीने नुकतीच आर्थिक मदत करण्यात आली. शिशुगृहातील बालकांच्या पोषणासाठी १३ हजार रुपयांची दूध पावडर देऊन मदतीचा हात पुढे करण्यात आला. या उपक्रमामुळे बालकांच्या पोषणात मोलाचा हातभार लागला असून विविध स्तरांतून या उपक्रमाचे कौतुक होत आहे. सह्याद्री अंकुर शिशुगृह हे विशेष दत्तक संस्था म्हणून कार्यरत असून येथे ० ते ६ वयोगटातील अनाथ, बेवारस व टाकाऊ अवस्थेतील बालकांना आश्रय दिला जातो. त्यांच्या आरोग्य, शिक्षण व सर्वांगीण विकासाची व्यवस्था येथे करण्यात येते.या शिशुगृहात नुकतीच आनंददायी घटना घडली. एका महिन्यापूर्वी दोन अनाथ बालकांना दत्तक प्रक्रियेद्वारे नवीन पालक मिळाले. विशेष म्हणजे ही दोन्ही बालके जन्मल्यानंतर काही तासातच शिशुगृहात दाखल झाली होती. सध्या ही मुले आपल्या नव्या कुटुंबात आनंदाने नांदत आहेत. या यशस्वी दत्तक प्रक्रियेने शिशुगृहाच्या कार्यास नवी प्रेरणा दिली आहे. अंजुमन वेल्फेअर सोसायटी आरोग्य व सामाजिक क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून सक्रिय आहे. नुकतेच संस्थेच्या वतीने शेख फातिमा या दोन वर्षांच्या चिमुकलीच्या हृदयविकार उपचारासाठी ३५ हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे. याशिवाय संस्थेने आतापर्यंत शेकडो गरजूंना दानशूरांच्या माध्यमातून मदतीचा हात दिला आहे. भविष्यातही अशी मदत सुरू राहील अशी अपेक्षा संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आली. संस्थेने मदत करणाऱ्या सर्व दानशूर देणगीदारांचे आभार मानले.या कार्यक्रमाला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे डॉ. शफिक अहमद मुंडेवाड, सह्याद्री अंकुर शिशुगृहाचे मार्गदर्शक डॉ. दिग्गज दापके–देशमुख, तालुकास्तरीय बाल संरक्षण समिती सदस्य गणेश वाघमारे, गजानन पाटील, अधीक्षक इश्वर राठोड, तसेच डॉ. अरशद सय्यद, जाकेर सय्यद, शशिकांत करंजकर, अभिजित शेळके, अंजुमन वेल्फेअर सोसायटीचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी शिशुगृहातील बालकांशी संवाद साधण्यात आला. त्यांच्या निरागस डोळ्यांत उमलणारा आनंद पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले. उपस्थित मान्यवरांनी शिशुगृहाच्या कार्याचे कौतुक करून सामाजिक बांधिलकी जपण्याचे आवाहन केले.

# जवळा येथील महसूल व वन विभागाच्या शिबिराला प्रतिसाद




आरंभ मराठी | जवळा

महाराष्ट्र शासनाच्या वतीने तसेच महसूल व वन विभाग अंतर्गत परंडा तालुक्यातील जवळा नि. येथे हनुमान मंदिरात समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये गोरगरीब शेतकरी, अल्पभूधारक, वयवृद्ध ,पेन्शन धारक , रेशन कार्ड धारक यांना विविध योजनांचा लाभ देण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना शैक्षणिक दाखले, प्रमाणपत्र नोंदणी सह वाटप करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरामध्ये ग्रामस्थांनी सहभाग घेऊन ग्राम स्तरावरील विविध मागण्या तहसीलदारासमोर मांडल्या. यावेळी तहसीलदारांनी महसूल विभागातील सर्व अधिकाऱ्यांना ग्रामस्थांच्या अडीअडचणीचा निपटारा करण्यास सांगितले. यावेळी विभागातील रेशनकार्ड व निराधारचे अर्ज स्वकारण्यात आले. शेतकऱ्यांच्या फार्मर आयडी नोंदणी करण्यात आली. याप्रसंगी निलेश काकडे (तहसीलदार), पूजा गोरे (नायब तहसीलदार) , ग्राम महसूल अधिकारी विजय खोसे (जवळा नि), संतोष गुळ मेरे (ग्राम विकास अधिकारी जवळा), शितल वाघमारे (सरपंच जवळा), संजय स्वामी (मंडळ अधिकारी जवळा ),( संदीप यादव सहाय्यक कृषी अधिकारी), गणेश गवारे , अरविंद कातुरे, विकास कारकर तसेच गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी

आपलं धाराशिव.

गुरूवार दि.19 जून 2025

# पोरांना लग्नासाठी नवरी मिळेना 'वर' पित्याला लागतोय लाखो रुपयांचा चुना

## परंडा तालुक्यात बनावट लग्न लावणाऱ्या टोळ्या सक्रिय

अर्जुन गोडगे | आरंभ मराठी



परंडा –सध्या लग्नाळू मुलांची संख्या हजारात असताना मुलींची संख्या मात्र शेकड्यात आहे. त्यामुळे मुलांना लग्नासाठी मुलगी मिळणे मुश्किल झाले आहे. लग्नाळू मुलांच्या आई–वडिलांना मुलाच्या लग्नाची चिंता सतावत असून, मुलाच्या लग्नासाठी काहीही करण्यास हे पालक तयार असल्याचे चित्र दिसते. याचाच गैरफायदा काही लोकांकडून घेतला जात असून, लग्न जमवण्याचा नावाने वर पित्याला लाखो रुपयांचा चुना लावण्याच्या घटना परंडा तालुक्यात समोर आल्या आहेत. त्यामुळे वर पित्यांनी सावधगिरी बाळगण्याची गरज आहे.नव्वदच्या दशकामध्ये जन्मलेल्या आणि सध्याच्या घडीला तिशी ओलांडलेल्या पोरांच्या लग्नाचा गंभीर प्रश्न ग्रामीण भागामध्ये सतावत आहे. परंडा तालुक्यातील ७२ गावांमध्ये मोठ्या प्रमाणात तरुण अविवाहित आहेत. कोणत्याही परिस्थितीत पोराचे हात पिवळे करण्यासाठी आई बापाला दिवसाढवळ्या लाखो रुपयांचा चुना लागत असल्याच्या घटना दिवसेंदिवस घडत आहेत. गेल्या वर्षभरात लग्नाळू तरुण हेरून त्यांची फसवणूक करणाऱ्या अनेक टोळ्या धाराशिव जिल्ह्यात सक्रिय झाल्या आहेत. एजंटच्या माध्यमातून लग्नासाठी पाच ते दहा लाख रुपये मागण्यात येतात. विश्वास संपादन होईपर्यंत एक दीड महिना नवरी घरी राहते, अन् लाखो रुपयाचा चुना लावून नवरी अंगावरील पिवळी हळद निघण्याच्या आधीच भुर्रर्र होते. काही वेळेला 'आपलेच दात, आपलेच ओठ' म्हणत पोलिसात फिर्यादही दिली जात नाही.घरी शेतीवाडी बागायती, राहायला पक्के घर मात्र वाढत चाललेले वय आणि लग्नाला मुलगी मिळत नसल्याने अनेक कुटुंब बेचैन झाले आहेत. मुली शोधताना मुलाच्या वडिलांची मोठी दमछाक होत आहे हे मात्र नक्की. यातूनच काही महिन्यापासून आर्थिक गंडा घालून खोटे लग्न लावून देणाऱ्या टोळ्या सक्रिय झाल्या आहेत. तरुणाची फसवणूक झाल्याच्या घटना तालुक्यात विविध ठिकाणी घडल्या आहेत. लग्नाळू नवरदेवाला आर्थिक गंडा घालून फसवले जाताना समाजात इज्जतीचा प्रश्न निर्माण होईल या भीतीपोटी झाकली मूठ असे मानून मुलाच्या कुटुंबीयांवर पश्चातापाची वेळ येत आहे.बनावट नातेवाईक लग्नासाठी नवरी घेऊन येतात. जिथे अनेकदा लग्न लावून दिलेले असते तीच नवरी नवरदेवाला दाखवली जाते. मोजक्या लोकांत बैठक होऊन स्थळ पक्के करून लग्न लावायच्या आधीच अर्धी व लग्न लावल्यानंतर अर्धी रक्कम हातात घेऊन रॅकेटमध्ये सहभागी असलेली ठग वाटणी करून घेतात. मग नवरी नवरदेवाच्या घरी गेल्यानंतर काही दिवस राहते व सर्व काही थंड झाले विश्वास संपादन केला की पसार होते. त्यामुळे सध्याच्या काळातील ग्रामीण भागातील मुलांच्या लग्नाचा प्रश्न 'आ'वासून उभा आहे.लग्न हा तर प्रत्येकाच्या आयुष्यातील महत्त्वाचा घटक. परंतु, आयुष्यभर जमा केलेली पुंजी कुण्या भामट्याने लुटली तर पश्चातापाची वेळ येते. त्यामुळे लग्नाळू तरुणांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी अशा टोळी पासून सावध भूमिका घेत सर्व गोष्टीची चौकशी करूनच निर्णय घ्यावा. मुलगाच हवा ह्या हव्यासापोटी ९० च्या दशकात आईबापांनी केलेल्या कर्माचे फळ आजचे तिशी पार तरुण भोगत आहेत.

## लग्नाचे आमिष दाखवून विवाहित महिलेवर लैंगिक अत्याचार

आरंभ मराठी | बेंबळी

लग्नाचे आमिष दाखवून एका विवाहित महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना धाराशिव तालुक्यातील एका गावात उघडकीस आली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, एका गावातील २६ वर्षीय महिला (नाव व गाव गोपनीय) या महिलेवर दिनांक १२ मार्च २०२० ते २२ मे २०२५ या काळात एका तरुणाकडून लैंगिक अत्याचार करण्यात आला. पीडित महिलेचा नवरा तिच्यासोबत सतत भांडणं करत असल्याने व तिच्या सोबत राहत नसल्याचा फायदा घेवून गावातील एका तरुणाने तिलालग्नाचे आमिष दाखवले. तसेच तिला लग्नाचे वचन देवून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. पोलीसात तक्रार केली तर जिवंत ठेवणार नाही अशी धमकी देवून त्या तरुणाने तरुणीसोबत लग्न करण्यास व तिला सांभाळण्यास नकार दिला. पिडीत तरुणीने दिनांक १७ जून रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम–६९, ३५१ (२),(३) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## आरोग्य विभागात नोकरी लावण्याचे आमिष दाखवून आठ लाख रुपये लुटले; दोघांवर गुन्हा दाखल

आरंभ मराठी | धाराशिव

आरोग्य विभागात नोकरी लावण्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीची दोघांनी आर्थिक फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, आरोपी अंकुश देशमुख (रा. नरखेड ता. मोहोळ जि. सोलापुर), संजय यमाजी साळवे (रा. मुंबई) यांनी दिनांक १२ ऑक्टोबर २०२१ ते ३१ ऑक्टोबर २०२१ या काळात एस पी ऑफीस धाराशिव समोरील प्रभात मल्टीस्टेट बँक येथे फिर्यादी दत्तात्रय संपत करवर (वय ३८ वर्षे, रा. राघुचीवाडी धाराशिव) यांना नमुद आरोपींनी आरोग्य विभागात नोकरी लावण्याचे आमिष दाखवून फिर्यादी कडून आठ लाख दहा हजार रुपये रक्कम रोख तसेच ऑलनाईन घेवून फिर्यादीस कोणतीही नोकरी न लावता फसवणुक केली. फिर्यादी दत्तात्रय करवर यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे धाराशिव शहर येथे भा.दं.वि.सं.कलम ४०६, ४२०, ३४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## अभिनव इंग्लिश स्कूलची मान्यता रद्द करा–मनसेची मागणी

आरंभ मराठी | धाराशिव




धाराशिव शहरातील अभिनव इंग्लिश स्कूल शाळेमध्ये कु.वेदीका सचिन मोरे ही इयत्ता पाचवी वर्गात शिक्षण घेत आहे.तिच्या पालकांना फीस भरण्यास विलंब झाल्यामुळे या विद्यार्थ्यानीला वर्गाच्या बाहेर व शाळेच्या बाहेर कढण्यात आले. सावित्रीच्या लेकी म्हणून मनोधैर्य वाढविणारा समाज एकीकडे आणि त्याच लेकीला फिस भरण्यास उशीर झाल्यामुळे शिक्षणाचे व्यापारीकरण करणारी अभिनव इंग्लिश स्कूल शाळेतून बाहेर काढत आहे. हा प्रकार दिनांक १७ जून रोजी घडला असून, पालकांनी शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांना भेटून शाळेवर कारवाई करण्यासाठी निवेदन दिले आहे. आर. टी.ई.अंतर्गत शिक्षणाचा लाभ न देणे, आर.टी. ई. अंतर्गत विद्यार्थ्यांचे वर्ग वेगळे करणे, आर.टी.ई. अंतर्गत विद्यार्थ्यांकडून फीस वसूल करणे, जास्तीची फिस घेणे, पालक समिती निवड न करणे, विद्यार्थ्यांना लातूर पॅटर्नची सक्ती करून लाखोंची लुट करणे, तसेच शालेय साहित्य सांगितलेल्या दुकानातूनच खेरीदीची सक्ती केली जात असल्याच्या तक्रारी निवेदनात करण्यात आल्या आहेत.हे निवेदन मनसेचे जिल्हा सचिव दादा कांबळे यांनी शिक्षण अधिकारी प्राथमिक व माध्यामिक यांना भेटून दिले. यावेळी मुलीचे पालक सचिन मोरे, समाजसेवक महादेव माळी उपस्थित होते.

## शेतीविषयक शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी तातडीने काढून घेण्याचे आवाहन




आरंभ मराठी | तेर

केंद्र सरकारच्या वतीने डिजिटल कृषी मिशन अंतर्गत शेतकऱ्यांना डिजिटल ओळख देण्यासाठी फार्मर आयडी कार्ड देण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. परंतु अद्यापही काही शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढला नाही. त्यांनी तातडीने फार्मर आयडी काढून घ्यावा असे आवाहन स्थानिक प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. डिजिटल ओळखपत्रच्या या माध्यमातून शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनेचा लाभ होण्यासाठी या फार्मर आयडी चा उपयोग होणार आहे. डिजिटल पब्लिक इन्फास्ट्रॅक्चर फॉर एग्रीकल्चर अंतर्गत ॲग्रीस्टेक हा प्रकल्प पूर्ण देशात राबविण्यात येत आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने ही हा प्रकल्प राबविण्याचे निर्णय घेतला आहे. ॲग्री स्टॅक संकल्पने अंतर्गत शेतीविषयक योजनेचा लाभ घेण्यासाठी हा फार्मर आयडी बंधनकारक आहे. फार्मर आयडी कार्ड शेतकऱ्याच्या आधारशी लिंक करण्यात येणार आहे, जे शेतकऱ्याच्या जमिनीच्या नोंदीशी जोडले जाईल. त्यामुळे या महत्त्वपूर्ण कार्डद्वारे विविध योजनांचा लाभ होणार आहे या मिशन अंतर्गत ज्या शेतकऱ्यांची नावे जमीन आहे अशा प्रत्येक शेतकऱ्याला युनिक आयडी देण्यात येणार आहे याद्वारे सुविधांचा लाभ घेणे सोपे होईल.

## चिकुंद्रा येथे ड्रीम फाउंडेशनमार्फत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

आरंभ मराठी | नळदुर्ग



विद्यार्थ्यांना एमपीएससी, यूपीएससी सोबतच इतर क्षेत्रात देखील नोकरीच्या मोठ्या प्रमाणात संधी आहेत. त्यामुळे करिअर म्हणून परकीय भाषा, जपान मधील जैव तंत्रज्ञान , मधील संधीचा लाभ घ्यावा. तसेच पालकांनी आपल्या मुलांसाठी घरात अभ्याससाठी पूरक वातावरण बनविणे, रात्री सात ते नऊ या वेळेत मोबाईल बंद ठेवावे व गावात मुलांसाठी अभ्यासिका असावी यासाठी पावले उचलावी असे आवाहन लक्ष अकॅडमी चे संचालक सचिन गायकवाड यांनी चिकुंद्रा येथे ड्रीम फाउंडेशनच्या वतीने आयोजित दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंत गायकवाड तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच सोनाली ताई कानडे, उपसरपंच सुकेशनी ताई मोटे, मुख्याध्यापक गजानन मक्तेदार, मुख्याध्यापक पांडुरंग पवार हे उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दहावी व बारावीतील जवळपास ५० विद्यार्थ्यांना ड्रीम फाउंडेशन च्या वतीने प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष नजीर शेख, उपाध्यक्ष महादेव गरड, कार्याध्यक्ष भैरवनाथ गायकवाड, अण्णासाहेब गायकवाड यांच्यासह इत्यादी जणांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महादेव गरड यांनी तर सूत्रसंचालन सत्यवान गायकवाड यांनी केले. आभार नजीर शेख यांनी मानले. यावेळी शशिकांत गायकवाड, अमोल गायकवाड, पंडित गरड ,भागवत जोगी, प्रकाश गायकवाड ,अंबादास मोटे ,रघुनाथ मोटे यांच्यासह पालक शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उमरगा शहर आणि तालुक्यामध्ये वृक्ष लागवड

आरंभ मराठी |उमरगा



ाराशिव जिल्ह्यातील उमरगा शहरात सखी महिला बचत गट, मॉर्निंग वॉक, समाज विकास संस्था, सर्व संस्थांचे कार्यकर्ते पदाधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने उमरगा तालुका आणि शहरांमध्ये वृक्ष लागवड आणि संवर्धनाचा महोत्सव घडतो आहे. जिजाऊ चौक, शिवपुरी कॉलनी, पेन रोड परिसर आणि समाज विकास संस्थेचे मधुकर धस प्रशिक्षण केंद्र तुरोरी अशा विविध ठिकाणी संकरित बोरी, आंबे, जांभूळ आणि सावली आणि ऑक्सिजन देणारी झाडे लागवड करण्याचा उपक्रम हाती घेतला. झाडे लावून त्यांचे संगोपन करण्याचे कार्य येथील स्वयंसेवक करत आहेत. भूमिपुत्र वाघ यांचे धर्मगुरू विश्वनाथ अण्णा तोडकर यांची ६१ वी वृक्षारोपण करून साजरी करण्यात आली. त्यासोबत सखी महिला मंडळाच्या वतीने आणि मॉर्निंग वॉकचे कार्यकर्ते पदाधिकारी यांनी वृक्ष लागून संवर्धनाचा संदेश घोषणा देत जनजागृती करत वृक्ष लागवडीचे महान कार्य परिसरातील स्वयंसेवकांच्या सहभागातून घेण्यात आले. याप्रसंगी तीनही संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते स्वयंसेविका महिला भगिनी सहभागी झाल्या होत्या. समाज सेवक भूमिपुत्र वाघ समाजसेविका माळगेताई यांच्या विनंतीला मान देऊन परिसरातील कार्यकर्ते उपक्रमामध्ये सहभागी झाले होते. हा विचाराचा महोत्सव, वृक्ष संवर्धनाचा महोत्सव, वृक्ष लागवडीचा महोत्सव, ऑक्सिजन निर्मितीचा महोत्सव, माणसातील माणूसपण जागवणारा महोत्सव म्हणून याकडे सर्वांनी लक्ष देऊन आपल्या पृथ्वीवर हरित क्रांती करावी यासाठी या तिन्ही संघटना कार्यरत असल्याची माहिती भूमीपुत्र वाघ यांनी दिली.

## नळदुर्ग शहरात आम्मा पुरस्कार सोहळा उत्साहात

### डॉ. जे. बी. वडणे यांचा आम्मा पुरस्काराने सन्मान

आरंभ मराठी |नळदुर्ग




नळदुर्ग येथील कै.यमुनाबाई रंगराव अहंकारी प्रतिष्ठानच्या वतीने नळदुर्गचे माजी नगरसेवक व ब्राह्मण समाज संघटनेचे अध्यक्ष विनायक अहंकारी यांनी आयोजित केलेला ''आम्मा पुरस्कार सोहळा'' मोठ्या उत्साहात संपन्न झाला. माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी आपल्या मातोश्री कै.यमुनाबाई रंगराव अहंकारी यांच्या स्मरणार्थ ''आम्मा पुरस्कार'' सुरु केला आहे. १७ जुन रोजी आपल्या आईच्या ५ व्या पुण्यतिथी निमित्त या आम्मा पुरस्कार सोहळ्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षी हा पुरस्कार नळदुर्ग येथील सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी डॉ.जे. बी वडणे यांना त्यांच्या वैद्यकीय सेवेचे ५० वर्ष पुर्ण झाले म्हणुन देण्यात आला. तर दुसरा पुरस्कार पत्रकार विलास येडगे यांना त्यांच्या पत्रकारीता सेवेला ३५ वर्ष पुर्ण झाले म्हणुन देण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन माजी नगराध्यक्ष शहेबाज काझी, नितीन कासार, माजी उपनराध्यक्ष शफिभाई शेख, माजी नगरसेवक कमलाकर चव्हाण, माजी नगरसेवक व भाजपचे शहर अध्यक्ष बसवराज धरणे, ब्राह्मण समाज संघटनेचे सचिव मुकुंद नाईक, सामाजिक कार्यकर्ते अझहर जगीरदार, शिवसेनेचे सरदारसिंह ठाकुर, धिमाजी घुगे,पद्माकर घोडके, रघुनाथ नागणे, रमेश जाधव, समीर मोरे उपस्थित होते. प्रारंभी सर्व मान्यवरांचा सत्कार कै. यमुनाबाई रंगराव अहंकारी प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आला. यानंतर सर्व मान्यवरांच्या हस्ते सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी डॉ. जे. बी. वडणे व पत्रकार विलास येडगे यांना ''आम्मा पुरस्कार'' देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमास जेष्ठ नागरीक बाळासाहेब कुलकर्णी, वसंतराव अहंकारी, बाबुराव वैद्य, अशोकराव केसकर, वसंतराव रामदासी, उत्तम राव रामदासी, सुधीर पुराणिक, मुकुंद भुमकर, तानाजी नागणे,पत्रकार तानाजी जाधव,उत्तम बनजगोळे, दादासाहेब बनसोडे, राजेंद्र महाबोले, सतीश जाधव, अमर भाळे हे उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांच्यासह सचिन भुमकर, ज्ञानेश्वर केसकर, अजय देशपांडे, उमेश जाधव, सन्नी भुमकर, प्रदीप ग्रामोपाध्ये, उमेश नाईक, संतोष नाईक, सदानंद नाईक, हालीम पटेल, बंडाप्पा कसेकर, सौरभ रामदासी, प्रसन्ना कुलकर्णी, गणेश मोरडे, सुनिल गव्हाणे, अनिल पाटील, महेश कोप्पा, सुनिल गव्हाणे, विजय ठाकुर, रोहीत वाले यांनी परीश्रम घेतले. शेवटी विनायक अहंकारी यांनी सर्वांचे आभार मानले.

## दारफळ शाळेत प्रवेश उत्सव उत्साहात साजरा

आरंभ मराठी | धाराशिव




धाराशिव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दारफळ येथे नवीन शैक्षणिक वर्षानिमित्त आयोजित प्रवेश उत्सव मोठ्या उत्साहात व आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भैरवनाथ जाधव हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी गायकवाड यांनी उपस्थिती दर्शवली. शाळेचे मुख्याध्यापक बिभीषण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या प्रभात फेरीने झाली. ढोल–ताशांच्या गजरात व घोषणांच्या निनादात गावातून काढलेली ही प्रभात फेरी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. यानंतर शाळेत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे फुलं व टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले.विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वितरण, गणेश वाटप, तसेच शिष्यवृत्ती व परीक्षेत मेरिट यादीत आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या यशाचे कौतुक करत उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षक विजय पाटील , बाबू सावंत , प्रदीप बोरके, श्रीमती शशिकला कापसे, श्रीमती भाग्यश्री हुगे, श्रीमती रंजना करडे यांनी परिश्रम घेतले. या उत्सवामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, पालक व ग्राम स्थानींही उपक्रमाचे कौतुक केले.

## तुळजापूर रुद्रा सिटीमध्ये नाल्यात कचऱ्याचा साठा; नगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे नागरिक त्रस्त

आरंभ मराठी | तुळजापूर



तुळजापूर शहरातील रुद्रा सिटी परिसरातील नाली सध्या संपूर्णपणे कचरा आणि सांडपाण्याने भरलेली असून, या घाणीमुळे परिसरात दुर्गंधी आणि डासांचा प्रचंड त्रास होत आहे. प्लास्टिकच्या बाटल्या, फेकलेले कपडे, खाद्यपदार्थांचे अवशेष आणि इतर कचऱ्याने नाली तुंबली असून, त्यातून पाणी बाहेर सांडत आहे. स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा नगरपालिकेकडे तक्रार करूनही अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नसल्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. परिसरातील रहिवासी विशेषतः लहान मुले आणि वृद्ध यांना यामुळे आरोग्याच्या समस्या भेडसावत आहेत.नगरपालिकेने तात्काळ नालीतील कचरा काढून स्वच्छता करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडू, असा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे. या समस्येकडे संबंधित अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे, अन्यथा सार्वजनिक आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे.

## कत्तलीसाठी नेण्यात येणारी १८ वासरे पकडली

आरंभ मराठी |भूम

कत्तलीच्या उद्देशाने नेण्यात येणाऱ्या १८ वासरांचा टॅम्पो पकडून एकावर भूम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, आरोपी रमजान फरीद शेख (वय २१ वर्षे, रा. बावची ता. परंडा) याला दिनांक १७ जून रोजी सायंकाळी साडेसहा वाजता फ्लोरा चौक भुम येथे पिकअप ( क्र एमएच १८ बी.एल. १४५४) मध्ये गोवंशीय जातीच्या वासरांची कत्तलीच्या उद्देशाने वाहतूक करत असताना ताब्यात घेण्यात आले. यावेळी त्याच्याकडून ११ वासरे जिवंत, १ जर्सी गाय, १ रेडकु, १ कालवड व ४ मयत वासरे असा एकुण ६१,००० रुपये किंमतीची जनावरे तसेच वाहनासह एकुण ४,६१,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी गोवंशीय वासरे त्यांच्या चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करताना भुम पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे त्याच्याविरुद्ध कलम ५(अ), ५(ब), ९, ९ (अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सह प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११ (ड) (इ) (ई) (ऐ) (ठ) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.